# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक २०२०-२१

**क्रमांक:प्रले/एफडीटी/ १६ दिनांक:** 09/05/2020

**विषय :** कोविड-१९ च्या उपाययोजनांकरीता नगरसेवक निधीमधून रु.१० लाखापर्यंतचा खर्च करण्याबाबत तसेच आमदार निधी व जिल्हा नियोजन समिती यांच्या निधीमधून खर्च करण्याबाबत.

**संदर्भ :** प्रले/एफडीटी/१५ दिनांक: ३०.०४.२०२०

---

उपरोक्त संदर्भाधिन परिपत्रक क्रमांक प्रले/एफडीटी/१५ दिनांक: ३०.०४.२०२० अन्वये नगरसेवक निधी वापरण्याकरीता व सदर निधी कोणत्या बाबींवर खर्च करावा याबाबत मार्गदर्शक तत्त्वे प्रसारीत करण्यात आली आहेत. सदर निर्देशामध्ये खालील बाबीचा समावेश करण्यात येत आहे. सदर परिपत्रकातल्या उर्वरित सर्व बाबीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

१. विभागातील कार्यपध्दतींचा विलंब व वेळेचा अपव्यय टाळण्याकरिता कोव्हीड-१९ संबंधी नगरसेवक निधीमधून खर्च करण्याकरिता प्रस्ताविल्या बाबींपैकी ज्या बाबींचे दरपत्रिका (Rate Circular) मध्यवर्ती खरेदी खात्याकडे उपलब्ध असतील. त्याबाबींची खरेदी नगरसेवकांनी केलल्या मागणीनुसार विभाग कार्यालयाने मध्यवर्ती खरेदी खात्याने ठरवून दिलेल्या दराने व ठरवून दिलेल्या कंत्राटदारांकडून करावी. कारण सदर बाबींची गुणवत्ता तपासणी, कंत्राटदाराची नेमणूक व खरेदी दर मध्यवर्ती खरेदी खात्याने अंतिम केलेले असतात.

सर्व खातेप्रमुख व सहाय्यक आयुक्त यांनी याची नोंद घ्यावी व महाराष्ट्र शासनाच्या याबाबतच्या मार्गदर्शक तत्वांस अधिन राहून कार्यवाही करावी.

09/05/2020
प्रमुख लेखापाल (वित्त) प्र.

अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)